## प्रकरण – 2 रे

### स्वा॰ दादासाहेब उंडाळकर : जीवन चरित्र

## स्वा. दादासाहेब उंडाळकरः जीवन चरित्र

**जन्म :**

महाराष्ट्रातल्या वारकरी-धारकरी इत्यादी सर्व पंथात दैनंदिन प्रार्थनेचा नियम मोठया कटाक्षाने पाळण्यांत येतो. पारमार्थिकांना आपल्या जीवनाची कालक्रमणा जणू धारेवर धरल्यासारखी व आपला प्रत्येक वार सार्थकी लागल्याचे समाधान मिळवीत करावयाची असते. या देव भक्ताप्रमाणेच देशभक्तांचेही एक व्रत असते. चित्तवृत्तीला बाह्य परिस्थितीच्या अधिन न ठेवता ती स्वाधीन ठेवणे या समत्व योग मार्गाने देश भक्ताला जावे लागते. हे व अशा प्रकारचे संस्कार असणाऱ्या व लाभणाऱ्या काळात दादासाहेब उंडाळकर यांचा जन्म झाला.

सामान्य जनतेत असामान्य तेजाने स्फुल्लिंग निर्माण करणाऱ्या दादासाहेब उंडाळकरांचा जन्म उंडाळे, ता. कराड येथील शेतकरी कुटूंबात 20 व्या शतकाच्या प्रारंभी म्हणजे 1901 साली झाला. 1 उंडाळे गांव सातारा जिल्ह्यात कराड पासून जवळ असून ते दक्षिण मांड नदीच्या तीरावर वसले आहे. दुर्दैवाने दादांची जन्मपत्रिका आज उपलब्ध नाही. 2 दादांचे कागदोपत्रीचे नांव बाळकृष्ण आनंदराव पाटील असे असले तरी ते लहानपणापासूनच बाळकू पाटील किंवा बाळकू दादा पाटील या नांवाने उंडाळे व उंडाळे परिसरात ओळखले जात होते.

**बालपण :**

बाळकू दादांच्या वडिलांचे नांव आनंदराव लक्ष्मण पाटील असे होते. स्वभावाने ते अतिशय साधे-भोळे होते. बाळकुदादांच्या आईचे नांव कृष्णाबाई असे

होते. कृष्णाबाई या कामेरी ता.वाळवा, जि.सांगली येथील आण्णासाहेब पाटील यांच्या कन्या होत. दुर्दैवाने बाळकृष्णाच्या जन्मानंतर लगेचच मातोश्री कृष्णाबाईचा मृत्यु झाला.बाळकृष्ण आईविना पोरका झाला. बाळकृष्णाचे वडील साधे भोळे होते. उंडाळे येथे बाळकृष्णाचे पालन पोषण नीट होणार नाही म्हणून त्यानी बाळकृष्णाला आपल्या बहिणीकडे कुसूर ता.कराड येथे पाठविले. त्यांची बहिण व बाळकृंष्णाची आत्या या कुसूर येथील निळकंठराव देशमुख यांच्या धर्मपत्नी होत. त्यांनी बाळकृष्णाचे पालन–पोषण चांगल्याप्रकारे केले असे समजते. त्याला कोणत्याही प्रकारची उणीव भासू दिली नाही. आईविना पोरके असलेल्या बाळकृष्णावर त्याच्या आत्याचा फार जीव होता. बाळकृष्णाचे खुप लाड त्यानी केले. त्यामुळे बाळकृष्णाचा स्वभाव लहाणपणापासूनच तामसी बनला होता. बाळकृष्णाचा बालपणाची पहिली काही वर्षे कुसूर ता.कराड येथे गेली. कुसूर नंतर बाळकृष्णाच्या मामानी त्याला कामेरी येथे आणले. कामेरी येथे त्याच्या बालपणीचे काही दिवस गेले.3 अशाप्रकारे कुसूर व कामेरी येथे बाळकृष्ण लहानाचा मोठा झाला.

**<u>शिक्षण</u>** :

कामेरी येथे असताना बाळकृष्णाचे उरुण – इस्लामपूर येथील शाळेत नांव दाखल करण्यात आले. परंतु शाळेकडे बाळकृष्णाचे फारसे लक्ष नव्हते. तेथे त्याला शिकारीचा नाद लागला होता. त्यामुळे कसे–बसे मराठी चौथी पर्यंतचे शिक्षण त्याने पुर्ण केले. व पुढील शिक्षण घेण्याचा नाद सोडून दिला. त्याकाळी शिक्षणाबद्दल समाजामध्ये फारसी आत्मियता नव्हती तसेच बाळकृष्ण हा आईविना पोरका असलेने त्याच्या मामानी शिक्षणाबद्दल त्याच्यावर जबरदस्तीही केली नाही.

त्यामुळे दादानी मध्येच शिक्षण सोडून दिले. त्यांनी सवादे, ता. कराड येथील पुजारी गुरूजींच्याकडे खाजगी शिक्षण घेतले होते. असे समजते. 4

<u>**दादांच्यावर झालेले संस्कार**</u>

सर्व प्रथम दादांच्यावर ज्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव पडला होता, त्या व्यक्ति म्हणजे त्यांच्या आत्या व वडील आनंदराव लक्ष्मण पाटील या होत. दादांच्या मातोश्री त्यांच्या लहाणपणीच मरण पावल्या होत्या. त्यामुळे आईचा सहवास त्यांना लाभला नाही. बालपणीची सुरवातीची काही वर्षे दादांचा सांभाळ त्यांच्या आत्याने केला. आत्याने दादांचे मन वेगवेगळ्या संस्काराने घडविले. त्याचबरोबर दादांच्यावर मामांचाही प्रभाव पडलेला दिसून येतो. सत्यनिष्ठा, दुसऱ्याविषयी कणव, स्वावलंबन व दुसऱ्याला आपलेसे करण्याची वृत्ती हे संस्कार त्यांना त्याच्या वडीलांकडून मिळाले. तर स्वाभीमानाचे जीवन जगणे हा संस्कार मामांच्याकडून त्यांच्यावर झाला होता. नंतरच्या काळात दादांना जीवनातील अनेक संकटांना तोंड द्यावे लागले होते. त्या दृष्टीने त्यांची मनोभूमी वडील, आत्या व मामा यांनी तयार केली होती. श्रद्धेने, चिकाटीने व कष्टाने मानवाला असाध्य ते साध्य करता येते याची शिकवण त्यांना त्यांच्या वडीलांकडून व आत्याकडून मिळाली होती.

त्यांच्या वडिलांचा दृष्टीकोन समन्वयवादी समतोल विचारसरणीचा होता. दादांची आई त्यांच्या लहाणपणीच मरण पावली होती. त्यामुळे आईविना पोरके पोर म्हणून दादा सर्वांचे लाडके होते. पण त्यामुळे त्यांचा स्वभाव लहाणपणापासून तापट बनला होता, असे म्हटले जाते. 5

दादांच्यावर उंडाळे गावातील ज्या व्यक्तीचा प्रभाव पडला होता त्या व्यक्ती

म्हणजे विष्णू रामजी पाटील व ज्ञानू गणू पाटील या होत. विष्णू रामजी पाटील ही उंडाळे गावातील एक प्रमुख व्यक्ति होती. गावातील यात्रा भरविण्यांत व गावातील इतर सार्वजनिक कार्यामध्ये ते हिरिरीने भाग घेत असत. गावातील प्रत्येक व्यक्ति कोणत्याही कार्यासंबंधी त्यांचा सल्ला घेत असे. गावामध्ये त्यांना फार मान होता. तसेच ज्ञानू गणू पाटील हीदेखील उंडाळे गावातील महत्वाची व्यक्ति होती. या दोघांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव दादांच्यावर पडला होता. त्यांच्यामुळेच दादा गावातील सामाजिक कार्यामध्ये उस्फूर्तपणे भाग घेऊ लागले. शेतीच्या बाबतीत त्याच प्रमाणे गावातील सामाजिक कार्याबाबत, गावातील भांडण-तंट्याबाबत दादा विष्णू रामजी पाटील व ज्ञानू गणू पाटील यांचा सल्ला घेत असत, असे समजते. 6

सन 1928 सालापासून दादांना राजकारणाचा ध्यास लागला व ते कॉंग्रेसच्या कार्याकडे आकृष्ट झाले. त्यांना राजकारणांत व कॉंग्रेसच्या कार्यात सहभागी होण्याची प्रेरणा हरिभाऊ घोडके या ब्राम्हण सर्कल अधिकाऱ्याकडून मिळाली असे म्हणतात. त्यांच्या प्रेरणेमुळेच ते कॉंग्रेसच्या कार्यात सक्रीय भाग घेऊ लागले. 7 त्याचप्रमाणे बाबुराव गोखले, भाऊसाहेब सोमण वकील, दादासाहेब आळतेकर, पांडू तात्या डोईफोडे, वामनराव फडके वकील, दादासाहेब करंदीकर, पांडू आण्णा शिराळकर इ. अनेक पुढारी सातारा जिल्ह्यात होऊन गेले होते. त्यांच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव दादांवर पडला होता. दादांची ब्राम्हण समाजातील लोकांची जास्त जवळीक होती. कारण, त्या काळच्या समाजामध्ये ब्राम्हण वर्गच सुशिक्षीत होता. व हा वर्गच बौद्धीक दृष्ट्या समाजाचे नेतृत्व करत होता. त्यांच्या सानिध्यात राहील्यामुळे आपला वैचारीक विकास घडून येईल अशी दादांची धारणा होती. 8

दादांच्यावर म. गांधी व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा आणि विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. 1942 च्या चळवळीत दादांनी स्वतःला मनापासून झोकून दिले होते. 1942 च्या ऑगष्टपूर्वी देशाच्या घडामोडी कशा होतील यासंबंधी त्यांची व यशवंतराव चव्हाण यांची चर्चा झाली होती. त्यावेळी दादा त्यांच्या शैलीत यशवंतराव चव्हाण यांना म्हणाले होते, "यशवंतराव, म्हातारा (म. गांधी) अखेरची भाषा बोलू लागला आहे. मला ब्रिटीशांची धडगत दिसत नाही. काय जे ठरेल ते नेटाने करू". **9** दादांच्या या उद्‌गारावरून त्यांच्यावर गांधीजींच्या कार्याचा व विचारांचा किती विलक्षण प्रभाव पडला होता हे दिसून येते.

कर्मवीरांनी आपल्या रयत शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले. "कष्ट करा व शिका", हा त्यांचा मूलमंत्र होता त्यामुळेच त्यांनी सातार्‍याबाहेर माळावर विद्यार्थ्यांच्या कष्टाने नंदनवनासारखी बाग फुलविली. जो बहुजन समाज कालपर्यंत शिक्षणास वंचित होता, त्यास शिक्षणाची द्वारे खुली केली. कर्मवीरांनी महाराष्ट्रात शैक्षणिक चळवळ उभी केली होती. आचार्य अत्रे म्हणतात, "महाराष्ट्रात ज्ञानाची गंगोत्री चिपळूणकर, टिळक आणि आगरकर यांनी निर्माण केली. तिचे प्रवाह कर्व्यांनी स्त्री-वर्गामध्ये पोहोचविले. तर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लक्षावधी अस्पृश्यांच्या घरात पोहोचवून त्यांच्या उद्धाराचा मार्ग मोकळा करून दिला, पण त्या ज्ञानगंगेतील असंख्य प्रवाह भाऊरावांनी महाराष्ट्राच्या खेड्या-पाड्यातून, शेतातून, रानातून आणि दर्‍याखोर्‍यातून नेऊन बहुजन समाजामध्ये एक नविन सामर्थ्य आणि नवा आत्मविश्वास निर्माण केला". **10** कर्मवीरांनी "कष्ट करा व शिका" हा जो मंत्र आपल्या विद्यार्थ्यांना दिला त्याचा फार मोठा प्रभाव दादांच्यावर पडलेला दिसून येतो. गोर-गरिबांच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी घरचे दारिद्र्य आडवे येऊ नये म्हणून

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

सरकारने फी माफीची सवलत दिली. याबद्दल दादांचे विचार अत्यंत मौलिक आहेत. ते म्हणतात, "पालकांच्या गरिबीवर शिकणाऱ्या पोरांना सरकारने फी माफ केली त्याचा फायदा लबाड श्रीमंतांनी चांगलाच घेतलाय की? पोरांचे पालक म्हणून आई-मावशीचे नांव लावत्यात अन् त्यांचा धंदा घरकाम म्हणून पोरांची फी माफ करून घेतात. पोरांना हे उमगले की पोरे आता वाचलेल्या फीच्या पैशात टेरिलीनचे कपडे आणून ट्रांझिस्टर वापरू लागलीत, म्हणजे फसवाफसवी अन् चैन फैलावली. गांधी बाबांची खादी गेली. स्वदेशी संपली. यापेक्षा कर्मवीर भाऊराव पाटलांसारखी, "घाम गाळा अन् शिका शाळा", अशी काही तरी योजना सरकारने काढायला हवी. "घाम गाळा अन् शिका शाळा", असे झाले असते तर विद्यार्थ्यांत स्वाभीमान व आत्मविश्वास नंदादिपासारखा तेवत राहीला असता. श्रीमंतांच्या पोरांनाही श्रमाची किंमत कळाली असती. अन् सांदिपनीच्या आश्रमात जसे कृष्ण सुदाम सहाकर-समानता शिकले तसा बंधूभाव नव्या विद्यार्थ्यांतही आला असता". **11** दादांच्या या उद्‌गारावरून त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटलांच्या "कमवा व शिका", या मूलमंत्राचा किती प्रभाव पडला होता हे दिसून येते. त्या दृष्टीने त्यांनी गरिब, होतकरू हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अर्थिक मदत केली होती असे समजते. तसेच त्यांनी उंडाळे परिसरात अनेकविध शैक्षणिक संस्था चालवून शैक्षणिक कार्याचा भक्कम पाया घातला आहे.

## विवाह व संसारिक जीवन

दादांचा पहिला विवाह त्यांच्या आजोळी कामेरी, ता. वाळवा येथे त्यांच्या मामांची मुलगी हौसाबाई यांचेबरोबर मोठ्या थाटामाटोन पार पडला. हौसाबाई अत्यंत सोशिक स्वभावाच्या होत्या. त्यानंतर दादांना दुसरा विवाह करावा लागला. त्यांचा

दुसरा विवाह त्यांच्या आत्याची मुलगी पुतळाबाई यांचेबरोबर झाला. त्यांना दुसरा विवाह करण्याचे कारण म्हणजे दादांची आई त्यांच्या बालपणीच म्हणजे त्यांच्या जन्मानंतर एक वर्षाच्या आतच मरण पावली. त्यामुळे दादांचे पालन–पोषण त्यांच्या आत्यांना करावे लागले होते. व दादांच्या वडिलांनी आपल्या बहिणीला म्हणजे दादांच्या आत्याला असे वचन दिले होते की, त्यांच्या मुलीचा (पुतळाबाईचा) विवाह आपल्या मुलाशी करू त्यामुळे वडिलांच्या इच्छेखातर दादांना दुसरा विवाह करावा लागला. 12 तसे पाहिले तर दादांचे वैवाहिक जीवन अत्यंत सुखी व समाधानी होते. असे म्हणता येईल. दादांना पहिल्या पत्नीपासून (हौसाबाई) शामराव, जयसिंगराव व विलासराव ही तीन मुले झाली व द्वितीय पत्नीपासून (पुतळाबाई) दिनकरराव हा मुलगा झाला. त्यांना मुलगी नव्हती. ही चारही मुले मोठी कर्तबगार निघाली.

दादांचे सर्वात थोरले चिरंजीव हे देखील दादांच्याप्रमाणेच स्वातंत्र्य सैनिक होते. ते कॉंग्रेसचे क्रियाशील व एकनिष्ठ कार्यकर्ते होते. कराड शेती–उत्पन्न बाजार समितीच्या उभारणीत त्यांचा फार मोठा वाटा होता. ते शेती–उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन होते. शेती–उत्पन्न बाजार समितीत कार्य करत असतांना, कामाच्या व्यापामुळे त्यांचे प्रकृतीकडे दुर्लक्ष झाले. त्यातून त्यांना अनेक आजार उद्‌भवले आणि त्यातच 1950 साली त्यांचे अकाली निधन झाले. 13 आपल्या मुलाच्या अकाली निधनाने दादांना फार मोठा धक्का बसला.

दादांचे दुसरे चिरंजीव दिनकरराव पाटील हे भारतीय प्रशासन सेवेत होते. त्यांनी सातारा, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, पुणे व रत्नागिरी येथे जिल्हाधिकारी म्हणून प्रशंसनिय कामगिरी केली आहे. दादांचे तिसरे चिरंजीव जयसिंगराव पाटील

हे उंडाळे गांवात शेती व्यवसाय पहात आहेत. आणि उंडाळे गावातील समाज सेवेचे कार्य त्यांनी पुढे चालू ठेवले आहे. दादांचे सर्वात लहान चिरंजीव मा. विलासराव पाटील हे गेली अनेक वर्षे दक्षिण कराड विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. सर्वसामान्य जनतेमध्ये "काका" या टोपण नांवाने ते प्रिय आहेत. कराड तालुक्यातील अनेक सहकारी संस्थांचे ते प्रमुख अधारस्तंभ आहेत. मा. सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रीमंडळात पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. थोडक्यात दादासाहेब उंडाळकर कौटुंबिक जीवनात पुर्णपणे यशस्वी झालेले आहेत. त्यांनी आपल्या मुलांना सुसंस्कारीत करून सामाजिक व राजकीय कार्याची जाण करून दिली आहे.

दादांच्याकडे त्यावेळी सर्वसाधारणपणे 40 ते 45 एकर शेती होती. परंतू, 1928 सालापासून दादा राजकारणाकडे स्वातंत्र चळवळीत आकृष्ट झाले. त्यामुळे ते शेतीकडे फारसे लक्ष देऊ शकले नाहीत. त्यामुळे शेतीतून उत्पन्नही बेताचेच निघे. घरची अर्थिक परिस्थितीतीही तशी बेताचीच होती. **14**.

## दादांचे सार्वजनिक जीवन

1928 ते 1974 हा दादांच्या कर्तृत्वाचा कालखंड आहे. सर्वसाधारणपणे दादा एक स्वातंत्र्य सैनिक व राजकीय कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते. परंतू, त्यांनी सामाजिक व विधायक क्षेत्रात देखील फार मोठे कार्य केले आहे.

1928 सालापासून दादांना राजकारणाचा नाद लागला व ते काँग्रेसच्या कार्याकडे आकृष्ट झाले असे समजते. त्यांना राजकारणांत व काँग्रेसच्या कार्यात सहभागी होण्याची प्रेरणा हरिभाऊ घोडके या ब्राम्हण सर्कल इन्स्पेक्टरकडून मिळाली.

1932 साली दादांनी कूपर गटाविरूद्ध जिल्हा लोकल बोर्डाची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. त्याकाळात कूपर विरूद्ध झुंज हे खरोखरच फार मोठे धैर्याचे काम होते. या निवडणूकीत कूपर गटाचा पराभव करून ते लोकल बोर्डात निवडूण आले.**15** जिल्हा लोकल बोर्डात लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असतांना त्यांनी अनेक लोकोपयोगी सार्वजनिक हिताची कामे करून घेतली. या काळात आपल्या तालुक्याचा विकास कसा होईल हा एकच ध्यास त्यांना लागला होता. यानंतर 1936–37 साली मुंबई इलाख्यातील विधानसभेच्या निवडणूकीच्या काळात सातारा जिल्हा हा कूपरचा बालेकिल्ला ढासळून टाकणेचा निर्धार केला. या निवडणूकीत दादांनी कराड येथील शंकरराव मोहिते यांना उभे करून त्यांना निवडून आणले. **16**

दादांच्या अंगभूत कर्तृत्वाचा अतिशय उत्तम अविष्कार 1942 च्या "चलेजाव" चळवळीत दिसून आला. 9 ऑगष्ट, 1942 रोजी सर्व देशभर "चलेजाव" चळवळ सुरू झाली. यावेळी सातारा जिल्हा हा "चलेजाव" चळवळीचा बालेकिल्ला होता. कराड येथील मामलेदार कचेरीवर एक विराट मोर्चा न्यावा असा निर्णय त्या भागातील शेतकऱ्यांनी घेतला होता. मा. अच्युतराव पटवर्धन, यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाने दादांनी या मोर्चाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी स्विकारली. **17** त्यावेळी शांततामय मार्गाने मामलेदार कचेरीवर मोर्चा नेणे हे आव्हानात्मक कार्य होते. या मोर्चामध्ये कराड भागातील हजारो शेतकरी सामील झाले होते. दादा उंडाळकर यांनी या प्रचंड मोर्चाचे नेतृत्व असामानय धैर्याने केले आणि हा मोर्चा पूर्णपणे यशस्वी केला. हा प्रसंग महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहून ठेवण्या इतका मोलाचा आहे.

दादासाहेबांनी राजकिय कार्याबरोबरच सामाजिक क्षेत्रात देखील मोलाचे कार्य केले आहे. अस्पृश्योद्धार, हुंडा बंदी तसेच शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी फार मोठे कार्य केले आहे. जनसेवेतून सामाजिक परिवर्तनाची परिभाषा दादासाहेबांनी निर्माण केली व गरिबांच्या सेवेतच आनंद मानला. अस्पृश्यांवरील सामाजिक बहिष्कार अथवा जातीभेदाच्या पारंपारिक वृत्तीला त्यांनी कडाडून विरोध केला. हरिजन व सवर्ण यांची अनेकदा सामूदायिक सहभोजन घडविले. गोर–गरिबांना आर्थिक शोषणातून मुक्त केले. पारंपारिक वैरत्वाला, संघर्षाला केवळ सामंजस्याने मूठमाती देऊन समग्र क्रांतीच्या दिशेने वाटचाल करणारी समाज रचना त्यांनी प्रस्थापित केली. **18**

15 ऑगष्ट, 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दादांनी राजकारणाच्या साठमारीमध्ये बिलकूल भाग घेतला नाही. पुर्वी केलेल्या त्यागाची किंमत वसूल करण्याच्या युगात ते सत्ता स्पर्धेपासून सर्वथा अलिप्त राहिले. ना.चव्हाण यांच्याकडेही त्यांनी कधी याचक म्हणून मागणी केल्याचे दिसत नाही. गोष्टी सांगेन युक्तीच्या चार। हिच त्यांची भुमिका राहीली. **19**

दादांना वर्तमानपत्रे वाचण्याची खूप आवड होती. उंडाळे गांवाच्या बाजारपेठेतच एक लिंबाचे झाड होते. त्याच्या सावलीत एक थडगे बांधलेले आहे. तेथे वर्तमानपत्रे घेऊन दादा बसत असत. नंतर नंतर वयोमानामुळे दादांना निटशी अक्षरे दिसत नसत. तेव्हा प्राथमिक शाळेतील एखाद्या शिक्षकाला बोलावून घेऊन दादा त्याचेकडून पेपर वाचून घेत. सुरूवातील ठळक–ठळक मथळे वाचावयास सांगत, नंतर त्यातील एखादी महत्वाची बातमी संपूर्ण वाचून घेत. वाचन चालू असतांना चिड आणणारी बातमी असेल तर स्वतःशीच वैतागून जात असत. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांचेच सहकारी असलेले

पण स्वातंत्र्योत्तर लोकशाहीत राजकारणातून पूढे येऊन मोठी झालेली छोटया मनाची माणसे जेव्हा काही चूका करीत तेव्हा दादा खूप संतापून जात. 20

दादांचे शिक्षण फक्त मराठी चौथी पर्यंतचे होते. परंतू पेपर वाचून घेत असताना मात्र ते जागतिक राजकारणावर आपली मते मांडत असत असे समजते.

## दादांचा मृत्यु

जानेवारी 1974 मध्ये दादा आजारी पडले. त्यावेळी डॉक्टरनी कॅन्सरचे निदान केले होते. त्यामुळे त्यांना मिरज येथील डॉ. गायकवाड यांच्या हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॅ. गायकवाड यांच्या हॉस्पिटल मध्ये उपचार घेत असतानाच हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने 18 फेब्रुवारी 1974 रोजी त्यांचा मृत्यू झाला. जवळ-जवळ तीन आठवडे ते हॉस्पिटल मध्ये मृत्यूशी झुंज देत होते. 18 फेब्रुवारी 1974 या दिवशी त्यांचे मेहूणे बाबुराव कुसूरकर हे त्यांना हॉस्पिटल मध्ये भेटून कराडला आले. आणि पाठीमागे दादांचा मृत्य झाला. 21

दादांच्या मृत्यूची बातमी सर्व गावात तसेच उंडाळे परिसरातही पसरली. दादांचे शेवटचे दर्शन घेण्यासाठी त्या भागातून स्त्री-पुरुषांचा अक्षरशः लोंढा लागला होता. दादांच्या पार्थिव शरीराची वाट पहात लोक उंडाळयात थांबले होते. ही गाडी 4 चे सूमारास आली. बरोबर त्यांचे पूत्र विलासराव व दिनकरराव हे होते. दादांच्या निधनाचे वृत्त वा-यासारखे पसरताच सातारा जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांची रीघ उंडाळयाकडे लागली. दादांच्या अंत्ययात्रेस सुमारे 10,000 लोक जमा झाले होते. अंत्ययात्रेच्या वेळी प्रत्येक माणसाच्या डोळयातून अश्रू वहात होते. सामान्य जनतेचा कैवारी गेला हेच दृश्य दिसत होते. बाबासाहेब चोरेकर, जगन्नाथ पाटील,

आबासाहेब पार्लेकर आदि कार्यकर्त्यांनी यावेळी दादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. 22

## स्वा. दादासाहेब उंडाळकरांच्यावरील इतरांच्या प्रतिक्रिया

**1) यशवंतराव चव्हाण**

बाळकृष्ण उर्फ दादा उंडाळकर हे सातारा जिल्ह्यातील आमच्या पिढीला ज्येष्ठ भावासारखे व्यक्तीमत्व होते. आज ते आमच्यात नाहीत. पण त्यांचे कार्य आम्हास त्यांचे सतत स्मरण देत राहील आणि म्हणूनच कृतज्ञतापूर्वक आज ही श्रध्दांजली वहात आहे. 23

**2) बाळासाहेब देसाई**

कै. माननीय बाळकू पाटील उर्फ दादा यांचा स्वर्गवास ही मनाला चटका लावणारी दुर्दैवी घटनाच होय. दादा म्हणजे साहस, निर्णय, निर्धार व तो आमलात आणणारा लोह पुरुषच होय. खेडेगाव व खेडूत यांचे आकर्षन त्यांची मनोभावे सेवा करण्यासाठीची अहर्निश धडपड, स्पष्ट वक्तेपणा, निर्मळ मन, सदाचरण म्हणजे दादा। उंडाळे जिल्ह्यातील कै. दादा उंडाळकर म्हणजे बहूजन हिताय, बहूजन सुखय यासाठी उक्ती व कृती यांचा आदर्शच होते. 24

**3) ग.स.आळतेकर**

बाळासाहेबांचा व माझा वैयक्तिक स्नेहसंबंध 1930 सालापासूनचा आहे. आम्ही अनेक वेळा सार्वजनिक कार्यासंबंधी चर्चा केल्या. त्यांच्या निधनाने सार्वजनिक कार्य करणारा एक निष्ठावान व तळमळीचा कार्यकर्ता हरपल्याने समाजाची जशी हानी झाली. त्याचप्रमाणे माझा थोर व विश्वासू स्नेही गेल्याने वैयक्तीक हानी देखील मला जाणवत आहे. 25

4) **अनंतराव कुलकर्णी**

बाळकृष्ण आनंदराव पाटील हे दादा उंडाळकर म्हणून सर्व परिचित होते. सातान्यातले असामान्य ठरलेले दादा माणसाची मने जाणून घेऊन आपुलकीची जोपासना करीत होते. 18 फेब्रुवारी 1974 ला दादा गेले. सर्व उंडाळयाचा परिसर व तालुका त्या निष्ठावंत कार्यकर्त्यास मुकला. कै. दादांनी जे आदर्श कार्य केले ते आजच्या तरुण पिढीस प्रेरक ठरणारे असेच आहे. 26

5) **वि.स.पागे**

समाज घडविणेसाठी लोकशाही मुल्यांवर श्रध्दा, वैज्ञानीक दृष्टीकोन, आर्थिक शिस्त व स्वाभिमान यांची गरज आहे. या सर्वाचा संगम म्हणजे दादा होत. 27

6) **सी. सुब्रम्हणियम**

दादा उंडाळकर हे एक सामान्य शेतकरी परंतू ती एक असामान्य व्यक्ती होती. दुरदृष्टी व धैर्य असलेल्या दादांनी कराडच्या लोकांना स्वातंत्र्य संग्रामात मार्गदर्शन केले. 28

## एक यशस्वी जीवन

वैयक्तिक व कौटुंबिक जीवनात दादांना सर्व प्रकारचे सुख समाधान मिळाले. दादांचे दोन विवाह झाले. त्यांच्या दोन्ही पत्नी समजुतदार होत्या. आज त्यांची मुले सुसंस्कारीत आहेत. त्यांना सर्व प्रकारची सामाजिक राजकीय जाण आहे. दादांचे थोरले चिरंजीव शामराव पाटील स्वातंत्र्य सैनिक होते. तसेच ते कराड शेती उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन होते. त्यांचे दुसरे चिरंजीव दिनकरराव पाटील जिल्हाधिकारी म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेत होते. त्यांचे तिसरे चिरंजीव जयसिंगराव पाटील उंडाळे गावातील शेती पहात समाजसेवा करत आहेत. आणि चौथे चिरंजीव विलासराव पाटील आज विधान सभेचे सदस्य आहेत. सर्व मुलांची संपतिक स्थिती चांगली आहे.

दादांनी स्वातंत्र्य चळवळीतील आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यामुळे नावलौकिक आणि लोक प्रियताही मिळाली. म्हणूनच आज ते सर्वांचे म्हणजे उंडाळे आणि उंडाळे पंचक्रोशिचे दादा झाले.

## संदर्भ सूची


1. गोखले पुरुषोत्तम पांडूरंग :– माणस शहाणी होवाया हवीत.

   संपादक :– विठ्ठल पाटील, डॉ. कन्हैया कुंदप.

   क्रांती पर्वातून परिवर्तनाकडे पृ.13

2. पाटील विठ्ठल, निवृत्त ग्रंथपाल – कराड नगरपालीका वाचनालय.

   मुलाखत दि. 18.4.94 ठिकाण – उंडाळे

3. पाटील जयसिंगराव बाळकृष्ण

   मुलाखत दि. 21.4.94 ठिकाण – उंडाळे

4. पाटील बापूराव बळवंत, निवृत्त प्राथमिक शिक्षक

   मुलाखत दि. 21.4.94 ठिकाण – उंडाळे

5. पाटील जयसिंगराव बाळकृष्ण

   मुलाखत दि. 21.4.94 ठिकाण – उंडाळे

6. पाटील बापूराव बळवंत

   मुलाखत दि. 21.4.94 ठिकाण – उंडाळे

7. पाटील जयसिंगराव बाळकृष्ण

   मुलाखत दि. 21.4.94 दिकाण – उंडाळे

8. कित्ता

9. चव्हाण यशवंतराव, "देशभक्त दादा उंडाळकर"

संपादक :- विठ्ठल पाटील, कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ. 3

10. देशमुख पंजाबराव

कर्मवीर भाऊराव पाटील पृ. 87

11. गोखले पुरुषोत्तम पांडूरंग

माणस शहाणी होवाया हवीत

संपादक :- विठ्ठल पाटील, कन्हैया कुंदप

क्रांती पर्वातून परिवर्तनाकडे पृ. 14

12. पाटील जयसिंगराव बाळकृष्ण

मुलाखत दि. 21.4.94 ठिकाण उंडाळे

13. कित्ता

14. कित्ता

15. डॉ.मंगुडकर मा.प.

ध्येयवादी स्वातंत्र्य सेनानी – दादा उंडाळकर

संपादक :- विठ्ठल पाटील, कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ. 27,28

16. नावलीकर सदाशिव गोपाळ – स्वातंत्र्य सैनिक व
निवृत्त प्राथमिक शिक्षक मुलाखत दि. 30.4.94 ठिकाण – कराड

17. कुलकर्णी अंजली, थोर स्वातंत्र्य सेनानी व समाजसेवक
दादा उंडाळकर
स्मृती ज्योत दादा उंडाळकर स्मरणिका, 1994 पृ. 27

18. प्राचार्य थोरात प. ता.
"असामान्यत्वाचा अविष्कार, दादा उंडाळकर"
स्मृती ज्योत, दादा उंडाळकर स्मरणिका, 1994 पृ. 19

19. बॅ.पाटील पी.जी. "ओजस्वी साक्षेपी क्रांतीकारक"
संपादक :– विठ्ठल पाटील, कन्हैया कुंदप
क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ.11

20. प्रा. पाटील प्रकाश
समाज प्रबोधनाची आव्हाने पृ. 6

21. पाटील बापूराव बळवंत
मुलाखत दि. 21.4.94 ठिकाण – उंडाळे

22. स्वा. दादा उंडाळकर स्मारक समिती
स्मरणिका 1976

23. क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे
संपादक :– विठ्ठल पाटील, कन्हैया कुंदप पृ. 4

24. कित्ता पृ. 5

25. कित्ता पृ. 17

26. कित्ता पृ. 20

27. स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर स्मारक समिती

स्मरणिका – 1993

28. कित्ता.